# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


====================================================================

जावक क्रमांक – ५८३/२१ दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील १००० उपकरप्राप्त इमारतींचे संरचनात्मक परीनिरीक्षण मार्च अखेरपर्यंत करा -** 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल

मुंबई, दि. १३ फेब्रुवारी, २०२५ :- राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात म्हाडा मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकरप्राप्त इमारतींचा समावेश असून येत्या मार्चअखेर १००० उपकरप्राप्त इमारतींचे संरचनात्मक परीनिरीक्षण (Structural Audit) करण्याचे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी संबंधित अधिकार्यांखना दिले.

म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ अंतर्गत विविध कामांचा आढावा घेण्यासाठी श्री. जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीत श्री. जयस्वाल यांनी सदर निर्देश दिले. यावेळी मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ आदी उपस्थित होते.

श्री. जयस्वाल म्हणाले की, मंडळातील अंदाजे १३,००० उपकरप्राप्त इमारतींचे नव्याने संरचनात्मक सल्लागार यांची नियुक्ती करून पुढील एक वर्षात संरचनात्मक परीनिरीक्षण करण्याचे नियोजन करावे. शासनाच्या कृती आराखड्यात ५०० उपकर प्राप्त इमारतींची संरचनात्मक परीनिरीक्षण करण्याची बाब समाविष्ट आहे. त्यानुसार आजतागायत एकूण १७१ इमारतींचे परीनिरीक्षण करण्यात आले असून ३२ इमारतींचा संरचनात्मक परीनिरीक्षण अहवाल प्राप्त झाला असल्याची माहिती श्री. शंभरकर यांनी दिली.

श्री. जयस्वाल म्हणाले की, शासनाने संक्रमण शिबिरातील २००० गाळेधारकांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्याचे निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने मंडळाच्या अखत्यारीतील सर्व संक्रमण शिबिरांमधील २० हजार गाळेधारकांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण ३१ मार्चपर्यंत पूर्ण करण्यात यावे. तसेच दि. १३ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयाप्रमाणे संक्रमण शिबिरातील गाळेधारकांची अ, ब व क वर्गानुसार येत्या मार्च अखेरपर्यंत वर्गवारी करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी दिले.

कार्यालय व कार्यालयीन परिसर स्वच्छता मोहीम प्रत्येक कार्यालयात राबवण्यात यावी. तसेच याबाबत दर तीन महिन्यांनी सर्वेक्षण करण्यात येणार असून याबाबत प्रत्येक कार्यालयाने नोंद घेण्याच्या सूचनाही श्री.जयस्वाल यांनी केल्या.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील सर्व कार्यकारी अभियंतांनी एकूण अंदाजे १३,००० उपकरप्राप्त इमारतींना कलम ७९ (अ) १ (अ) अंतर्गत नोटीस देण्याच्या सूचना श्री. जयस्वाल यांनी दिल्या.

कलम ९१ (अ) अंतर्गत संपादित करण्यात येणाऱ्या व संपादित केलेल्या मालमत्तांच्या पुनर्विकासाबाबतची कार्यवाही लवकर करण्याचे निर्देश श्री. जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==============================================================================

Outward No. : 583/21 Dt. February 13, 2025

Press Release

# MHADA to conduct Structural Audit of 1,000 cessed buildings in Mumbai by March-End

## MHADA VP and CEO, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, directs officials to expedite the audit process as part of the state government's 100-day action plan

Mumbai, February 13, 2025: As part of the Maharashtra government's 100-day action plan, the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) has set a target to complete the structural audit of 1,000 cessed buildings in Mumbai by March 2025. MHADA Vice President and CEO, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, has instructed officials to accelerate the process to ensure the timely completion of the audit.

A review meeting was recently held at MHADA headquarters in Bandra (East) under the chairmanship of Mr. Sanjeev Jaiswal, IAS, to assess various projects under the Mumbai Building Repairs and Reconstruction Board. The meeting was attended by CO, Mumbai Building Repairs and Reconstruction Board, Mr. Milind Shambharkar; Joint CO, Mr. Umesh Wagh, and other senior officials.

During the meeting, Mr. Jaiswal emphasized the importance of conducting structural audits to assess the safety and redevelopment needs of aging buildings. He directed officials to appoint structural consultants and plan for the audit of approximately 13,000 cessed buildings over the next year. The government's action plan includes the structural audit of 500 buildings, of which 171 audits have already been completed, and reports for 32 buildings have been received, as informed by CO, Mr. Milind Shambharkar.

Mr. Jaiswal further instructed that the biometric survey of 20,000 commercial unit holders in transit camps be completed by March 31, 2025, in line with the state government's directives for 2,000 units. Additionally, he directed officials to classify transit camp occupants into categories A, B, and C by the end of March 2025, as per the government resolution dated September 13, 2019.

To maintain hygiene and improve workplace standards, Jaiswal ordered that cleanliness drives be conducted across all offices. A quarterly inspection system will be implemented, and each office will be required to maintain cleanliness records.

Mr. Jaiswal also directed executive engineers to issue notices under Section 79(A)(1)(A) for all 13,000 cessed buildings under the Mumbai Board's jurisdiction. He further instructed officials to expedite the redevelopment process for properties acquired under Section 91(A).

These measures will strengthen the administration of Mumbai's cessed buildings, ensure timely redevelopment, and improve the living conditions of residents.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA




म्हाडा
MHADA

